**ठळक बातम्या**

- दरवर्षी वीज दरात बदल करण्याची आणि सबसिडीचे सुसुत्रीकरण करण्याची राष्ट्रीय वीज धोरणाच्या मसुद्यात शिफारस

- जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतल्या उमेदवारी अर्जांची उद्या छाननी, महापौर पदाची सोडतही उद्या

- राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेच्या अंतिम फेरीत राज्यातले दोन संघ

**आणि**

- भारताविरुद्धच्या टी-ट्वेंटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा न्यूझीलंडचा निर्णय

**<><><><><>**

केंद्र सरकारनं आज राष्ट्रीय वीज धोरण २०२६ चा मसुदा जाहीर केला. राज्य वीज नियामक आयोगानं वीजेच्या दरांच्या संदर्भात आदेश दिला नाही तर योग्य निर्देशांकाच्या आधारे वीजेचे दर प्रत्येक वर्षी बदलण्याची शिफारस या मसुद्यात आहे. ग्राहकांना तसंच रेल्वे, मेट्रो आणि विविध उद्योगांना दिल्या जाणाऱ्या सबसिडीत सुसुत्रीकरण करण्याची शिफारस यामध्ये आहे. २०३० पर्यंत दरडोई वीज वापर २ हजार किलोवॅटपर्यंत आणि २०४७ पर्यंत ४ हजार किलोवॅटच्या पलीकडे घेऊन जाण्याचं उद्दिष्ट या धोरणात ठेवलं आहे. सध्या हे प्रमाण दीड हजार किलोवॅटपेक्षा कमी आहे.

सिडबीमध्ये ५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. या निर्णयामुळे २५ लाख ७५ हजारांपेक्षा जास्त सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातल्या लाभार्थ्यांना याचा फायदा होणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं अटल पेन्शन योजनेला २०३०-३१ या आर्थिक वर्षापर्यंत मुदत वाढ दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रीमंडळाच्या नवी दिल्लीत आज झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. या योजनेच्या लाभार्थ्यांना पेन्शन मिळत रहावी यासाठी कमी पडणारी रक्कम द्यायलाही मंत्रीमंडळानं मान्यता दिली. सध्या देशभरातल्या ८ कोटी ६६ लाखांहून अधिक नागरिकांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे. वयाची ६० वर्ष पूर्ण केल्यावर त्यांना १ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत पेन्शन मिळेल.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दावोस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा केली. नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळवण्याचा प्रयत्न केला जात होता. त्या मिळाल्यानंतर तिसऱ्या मुंबईतल्या पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत आहे, अनेक गुंतवणूकदारांनी यात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपली. उद्या अर्जांची छाननी होईल तर, २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. त्याच दिवशी अंतिम उमेदवार यादी आणि चिन्ह वाटप करण्यात येईल. पाच फेब्रुवारी रोजी मतदान आणि ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

**<><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत उद्या सकाळी ११ वाजता मंत्रालयात काढली जाणार आहे. त्यामुळे या

महापालिकांमधे सत्ता स्थापनेच्या तयारीत असलेले विविध पक्ष आपापल्या गटनेत्याची निवड निश्चित करत आहेत.

मुंबई महानगरपालिकेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या गटनेतेपदी माजी महापौर किशोरी पेडणेकर यांची निवड झाली आहे. मुंबईच्या महापौरपदाबाबत उद्धव ठाकरे जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल. महापौरपदासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत, सभागृहात विरोधकांची ताकद दाखवण्यापेक्षा मुंबईच्या भल्यासाठी जे करता येईल, ते आम्ही करू, असंही पेडणेकर म्हणाल्या.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिवसेनेनं ज्येष्ठ नगरसेवक विश्वनाथ राणे यांची गटनेतेपदी निवड केली आहे.

<><><><><>

कल्याण - डोंबिवली महापालिकेत शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय मनसेनं घेतला आहे. कल्याणचे माजी आमदार राजू पाटील यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन आज पाठिंबा जाहीर केला. महापौर, उपमहापौर आणि समिती अध्यक्ष पदाच्या संदर्भात एकनाथ शिंदे आणि महायुतीचे वरिष्ठ नेते निर्णय घेतील, अशी माहिती खासदार शिंदे यांनी दिली. १२२ सदस्य असलेल्या या महापालिकेत शिवसेनेचे ५३, भाजपाचे ५० आणि मनसेचे ५ नगरसेवक आहेत.

<><><><><>

उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या पक्षांनी शरद पवार आणि अजित पवार यांच्याप्रमाणे एकत्र यायला हवं अशी अपेक्षा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय जाधव यांनी व्यक्त केली आहे. भारतीय जनता पक्ष एकनाथ शिंदे यांचं राजकीय अस्तित्व संपुष्टात आणेल, त्यामुळे शिंदेंनी पवारांकडून धडा घेऊन शिवसेना एकजूट आहे हे दाखवून द्यावं असं जाधव म्हणाले.

<><><><>

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित असलेल्या राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी ४ विभागांमधल्या १६ संघांची निवड झाली आहे. नवी दिल्लीच्या बाल भवनात येत्या शनिवारी ही अंतिम फेरी होणार आहे. यात मुलांच्या गटात अहिल्यानगरमधल्या कोपरगाव इथल्या संजीवनी सैनिक शाळेची तर मुलींच्या गटात मुंबईच्या विक्रोळी इथल्या डॉन बॉस्को हायस्कूलची निवड झाली आहे. या स्पर्धेत देशभरातल्या ७६३ शाळांमधल्या दोन हजार २१७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. तिन्ही संरक्षण दलांच्या  प्रतिनिधींचा समावेश असलेली तज्ज्ञांची समिती अंतिम फेरीचं मूल्यांकन करेल.

<><><><>

शिवसेना तसंच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाचं नाव आणि पक्ष चिन्ह या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात आजही सुनावणी झाली नाही. आता पुढची तारीख मिळाल्यावर सुनावणी होईल, अशी आशा खासदार अरविंद सावंत यांनी व्यक्त केली. सुनावणीला होत असलेल्या विलंबाबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

<><><><>

विविध मागण्यांसाठी निघालेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा लाँग मार्च काल महाराष्ट्रातल्या पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. जिल्हाधिकारी कार्यालयाला आंदोलकांनी आज घेराव घातला असून ठिय्या आंदोलन सुरू केलं आहे. मागण्यांचं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिलं असून प्रशासन चर्चेसाठी तयार असल्याचं आमदार विनोद निकोले यांनी सांगितलं.

<><><><>

तुर्भे इथल्या रामतनु माता-बाल रुग्णालय पोषण पुनर्वसन केंद्रात 2 बालकांना तीव्र कुपोषण असल्याच्या संशयावरून  दाखल करण्यात आलं  होतं. त्यापैकी एका बालकामध्ये तीव्र कुपोषण तर दुस-या बालकामध्ये मध्यम कुपोषण असल्याचं

निष्पन्न झालं आहे.  या दोन्ही बालकांची प्रकृती सध्या  स्थिर असल्याची माहिती पालिकेच्या वतीनं देण्यात आली आहे. या रुग्णालयाव्यतिरिक्त वाशी, नेरुळ आणि ऐरोली सार्वजनिक रुग्णालयांमार्फत आत्तापर्यंत 128 तीव्र कुपोषण असलेल्या बालकांवर आणि 713 मध्यम कुपोषण असलेल्या बालकांवर उपचार करण्यात आले आहेत.

<><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज नागपूरमधे विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होत आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा एका षटकात बिन बाद ८ धावा झाल्या होत्या.

<><><><>

पुणे ग्रँड टूर–२०२६ सायकलिंग स्पर्धेचा दुसरा टप्पा आज झाला. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी सायकलपटूंना हिरवा झेंडा दाखवला. एकंदर १०९ किलोमीटर लांबीच्या या टप्प्यात पुणे शहर, पुरंदर, राजगड आणि हवेली या चार तालुक्यांतील ऐतिहासिक, ग्रामीण आणि डोंगराळ भागांतून जाणारा आव्हानात्मक मार्ग होता. सिंहगड रस्त्यावरील नांदेड सिटी परिसरात हा टप्पा पूर्ण झाला.

सासवड ते बारामती दरम्यान उद्या तिसऱ्या टप्प्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><>

यंदाच्या प्रजासत्ताक दिनी रायगडमध्ये ध्वजवंदनाचा मान रोहयो मंत्री भरत गोगावले यांना देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यापूर्वी दरवेळी हा मान

महिला बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना दिला जात होता. नाशिकमध्ये गेल्यावेळी प्रमाणे गिरीष महाजन ध्वजवंदन करतील. या दोन्ही जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला राज्य सरकारनं स्थगिती दिली आहे.

**<><><><><>**

अकोला शहरात २०१९ साली झालेल्या गवळी समाजाचे नेते किसनराव हुंडीवाले यांच्या हत्येप्रकरणी दहा आरोपींना अकोला जिल्हा आणि सत्र न्यायालयानं जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात पोलिसांनी एका माजी पोलीस उपनिरीक्षकासह १५ जणांवर आरोपपत्र दाखल केलं होतं. सध्या दोन आरोपी न्यायालयीन कोठडीत असून उर्वरित आठ आरोपींना अटक करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**//<><><><><>//**